| MHKO160006082022 | नियमित दिवाणी दावा क्र.१२०/२०२२ मधील<br>निशानी क्र २३ वरील आदेश |
|---|---|

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने दावा स्पेसिफिक रिलिफ ॲक्टचे कलम ३४, ३६ व ३७ प्रमाणे कायम मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. वादी यांनी कथन केले की, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी नं ५ म्हणून श्री शिवाजी चंदर शेलटे, रा. पुसार्ळे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर यांना समाविष्ठ करणेबाबत सदरचे अर्जात मागणी केली आहे, तसेच वादी त्यांचे वादपत्रामध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्ती करणेसाठी विनंती केली आहे - पान क्र. ७ वरती वरून सातव्या ओळीमध्ये "आपल्या नावाची नोंद करून घेऊन” या शब्दापुढे अर्जात नमूद प्रमाणे मजकूर सामील व्हावा, पान ७ वरती परिच्छेदमधील वरून ११व्या ओळीमध्ये "अडथळा करणेचा प्रयत्न” या शब्दानंतर "प्रतिवादी नं ३ ते ५” असा मजकूर समाविष्ट करणेत यावा, पान नं ८ वरती वरून पाचव्या ओळीमध्ये "प्रयत्न केला” या शब्दानंतर अर्जात नमूद प्रमाणे मजकूर समाविष्ट व्हावा, पान ८ वरती वरून पाचव्या व आठव्या ओळीमध्ये "४" ऐवजी "५" अशी दुरूस्ती करणेत यावी, पान नं ९ वरील कलम ७ मधील पहिल्या ओळीमध्ये "असे असल्याने” या शब्दानंतर अर्जात नमूद प्रमाणे मजकूर समाविष्ट व्हावा, पान नं ११ वरील परिच्छेद ९ मध्ये खालून दुस-या ओळीमध्ये "यांनी हरकत घेतली” या शब्दानंतर अर्जात नमूद प्रमाणे मजकूर समाविष्ट व्हावा, पान नं १३ वरील परिच्छेद १४ मध्ये पोट मागणी क मधील वरून तिस-या ओळीमध्ये "५४८/२०२२" या शब्दानंतर अर्जात नमूद प्रमाणे मजकूर समाविष्ट व्हावा, पान नं १३ वरील परिच्छेद १४ मध्ये पोटमागणी ड मधील पहिल्या ओळीमध्ये व पोटमागणी इ मधील खालून दुस-या ओळीमध्ये "४" ऐवजी "५" अशी दुरूस्ती करणेत यावी व पोट मागणी ई मधील पहिल्या ओळीमध्ये "४" ऐवजी "५" अशी दुरूस्ती करणेत यावी या दुरूस्तींसाठी सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीं यांनी सदरकामी त्यांचे म्हणणे न दिलेने त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आला आहे.

०४. मी वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादीं आणि प्रतिवादीं यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा स्पेसिफिक रिलिफ

ॲक्टचे कलम ३४, ३६ व ३७ प्रमाणे कायम मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये सदरचे दाव्यामध्ये अर्जात नमूदप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ म्हणून शिवाजी चंदर शेलटे यांना समाविष्ट करणेत यावे अशी विनंती केली आहे. तसेच सदरचे अर्जामध्ये वादी यांनी त्यांचे वादपत्रामध्ये त्या अनुशंगाने वर नमूदप्रमाणे विविध परिच्छेदमध्ये दुरूस्ती करणेत यावी, तसेच मजकूर सामील करणेत यावा अशी विनंती करून वादपत्रामध्ये दुरूस्तीस परवानगी मागितली आहे. प्रतिवादी यांनी सदरकामी त्यांचे म्हणणे न दिलेने त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आला आहे. सबब, वादी यांचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. वादी यांचे अर्जाचे स्वरूप पाहता तो मंजूर झाल्यास दाव्याचे मुळ स्वरूपावर कोणताही बदल होणार नाही. वादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती ही वादी आणि प्रतिवादीं यांचेदरम्यानचा मुख्य वाद निकाली करण्यासाठी आवश्यक आहे. तसेच, एकाच दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांचे सर्व मुद्दे निकाली निघणे गरजेचे आहे. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

आदेश

०१ अर्ज नि.२३ मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांना वादपत्रामध्ये अर्ज नि.२३ मध्ये नमूद केलेप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादीं यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.01.27 11:03:14 +0530

दिनांक- २४/०१/२०२३

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी